दै. प्रज्ञावाणी दि. 25.01.25

# मुदखेड पोलीस ठाण्यात कायदेविषयक कार्यशाळा संपन्न

वार्ताहर • मुदखेड



महाराष्ट्र शासनाचे प्रोजेक्टमधील कार्यक्रमानुसार पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये मुदखेड पोलीस ठाणे येथे मुदखेड पोलीस निरीक्षक वसंत सप्रे व डीएसबीचे किशोर पाटील, यांनी कार्यशाळेचे आयोजन दि. २२ जानेवारी रोजी केले होते.

या कार्यशाळेत भारतीय न्यायसंहिता या विषयावर माहिती देण्यासाठी मुदखेड न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस. बी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी केले, यानंतर एस. बी. पवार यांनी कार्यशाळेत उपस्थित असलेल्या तालुक्यातील पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधवांना भारतीय न्यायसंहिता या नवीन कायद्याविषयी माहिती दिली. यामध्ये नवे गुन्हे जसे समाविष्ट करण्यात आले आहेत, तसे काही नवीन शिक्षेचे प्रकार समाविष्ट करण्यात आलेले आहेत. यादी दंड, जप्ती, साधी कैद, तीन वर्षापर्यंत कारावास, अजन्म कारावास, सात वर्षापर्यंत फक्त मजुरी, फाशी असे मुख्य प्रकार असायचे. यामध्ये आता नव्याने छोट्या मोठ्या गुन्ह्यासाठी ज्यांची ज्यांची शिक्षा अधिकाधिक तीन वर्षे आहे. अशा गुन्ह्यासाठी कम्युनिटी सर्विस म्हणजे (सामाजिक सेवा) नावाची शिक्षा चालू होणार आहे. तसेच महिलांविषयी नवीन कायदा, ऑडिओ, व्हिडिओ, करताना कसे करावे यावरही थोडक्यात माहिती एस बी पवार यांनी दिली आहे. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले तर आभार एपीआय कांबळे यांनी मानले. या कार्यशाळेप्रसंगी सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस. बी. पवार, पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, बी. आर. कांबळे, खेडकर, डिएसबीचे किशोर पाटील, कैलास गोडसे, जयराम वने, सिद्धार्थ चौदंते, तालुक्यातील पोलिस पाटील व महिला पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष आणि पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.